दिनांक : १५.०४.२०२६

**: प्रेस नोट :**

**"महाराष्ट्र राज्य सहकार धोरण" सहकार विभागाची उच्चस्तरीय बैठक**

केंद्र शासनाने राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर केले आहे व सदर धोरणांतर्गत सर्व राज्यांनी राज्याचे सहकार धोरण करण्याकरिता सूचित केले आहे. महाराष्ट्र शासनाने मा.मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाचे सहकार धोरण बनविणेसाठी उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. सदर समितीची दुसरी बैठक आज दि.१५.०४.२०२६ रोजी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई येथे पार पडली असून सदर बैठकीत खालीलप्रमाणे समिती सदस्य व मान्यवर उपस्थित होते.

मा.श्री.बाबासाहेब पाटील – मंत्री सहकार, महाराष्ट्र राज्य, मा.श्री. जयप्रकाश रावल - मंत्री पणन, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.प्रविण दराडे, प्रधान सचिव, सहकार, महाराष्ट्र राज्य, मा.श्री. दिपक तावरे - सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. विद्याधर अनास्कर, प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मा.श्रीमती रश्मी दराद, मुख्य सरव्यवस्थापिका, नाबार्ड, मा.श्री.मधुकर चौधरी - सेवानिवृत्त सहकार आयुक्त, मा.श्री.विवेक जुगादे, महामंत्री सहकार भारती, मा.श्री.दिनेश ओऊळकर - सेवानिवृत्त अप्पर आयुक्त, मा.श्री.एस.बी.पाटील - सेवानिवृत्त अप्पर आयुक्त, मा.श्री. सिताराम राणे, अध्यक्ष, ठाणे जिल्हा को-ऑप.हौसिंग फेडरेशन, मा.श्री.जिजाबा पवार, सदस्य, महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, मा.श्री. संतोष पाटील - सहसचिव, सहकार विभाग, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.शरद जरे - पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा.श्री.राजेश सुरवसे, सदस्य सचिव तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था, पुणे, मा.श्री. विजय लहाने - सहसचिव, पणन व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत सहकार चळवळ अधिक मजबूत करणे, सहकार चळवळीत युवकांचा सहभाग वाढवणे, सहकार चळवळीत तंत्रज्ञान व AI चा वापर वाढवणे, सहकार चळवळीचा नविन क्षेत्रामध्ये शिरकाव करणे, या विषयावर चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीत मा. श्री. विद्याधर अनास्कर, मा.श्री.विवेक जुगादे, मा.श्री.मधुकर चौधरी व मा.श्री.सुहास पटवर्धन यांनी सादरीकरण केले. सदर सादरीकरणानुसार व उपस्थित झालेल्या मुद्दयांचा विचार करुन राज्य सहकारी धोरण शासनास सादर करण्यात येत आहे.

★★★★★